# कर्मचारी अधिकारपत्र

Magna निष्पक्षता व लोकाभिमुख व्यवहार यावर आधारित कार्यपद्धतीच्या नीतितत्त्वाशी बांधिल आहे. ही नीतितत्त्वे Magna च्या न्यायोचित उपक्रम संस्कृतीचा भाग आहे ज्यात कर्मचारी व व्यवस्थापन हे बरोबरीने कंपनीच्या यशाच्या वाटचालीची जबाबदारी उचलतात. यात या तत्त्वांचा समावेश आहे:

## नोकरीची सुरक्षितता

नोकरीची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे योग्य किमतीत उत्कृष्ट उत्पादन करून स्पर्धात्मक राहणे. आपल्या नोकरीची शाश्वतता टिकवण्यात आपली मदत करण्यासाठी आपल्यासोबत एकत्र काम करण्यास Magna वचनबद्ध आहे. आपली मदत करण्यास, Magna आपल्याला नोकरीविषयी समुपदेशन, प्रशिक्षण व कर्मचारी सहाय्यता कार्यक्रम उपलब्ध करून देईल.

## सुरक्षित आणि आरोग्याला पोषक कामाची जागा

आपल्याला एक सुरक्षित आणि आरोग्याला पोषक कामाची जागा प्रदान करण्यासाठी Magna वचनबद्ध आहे.

## न्याय्य वागणूक

Magna कोणत्याही प्रकारे भेदभाव व पक्षपात न करता वैयक्तिक पात्रतेनुसार व कार्यक्षमतेवर आधारित समान संधी प्रदान करते.

## स्पर्धात्मक वेतन आणि लाभ

Magna आपल्याला अशी सर्व माहिती पुरवेल जी वेतन आणि लाभ यासह मिळणारे आपले एकूण वेतन, यांची आपल्या प्रत्यक्ष प्रतिस्पर्धी व स्थानिक कंपन्या, ज्यांच्याशी आपला विभाग लोकांसाठी स्पर्धा करतो, त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या मिळकतीबरोबर तुलना करण्यात आपल्याला सक्षम करेल.

## इक्विटी आणि नफ्यामधील कर्मचाऱ्यांचा सहभाग

Magna चा असा विश्वास आहे की कंपनीच्या आर्थिक यशात प्रत्येक कर्मचारी वाटेकरी असावा.

## सूचना संचार आणि माहिती

व्यवस्थापन आणि कर्मचारी यांच्यातील नियमित मासिक सभांद्वारे आणि प्रकाशनांद्वारे, Magna आपल्याला माहिती प्रदान करेल जेणेकरून आपल्या कंपनीत आणि उद्योगामध्ये काय घडत आहे हे आपल्याला कळेल.

## हॉटलाईन

आपल्याला एखादी समस्या असल्यास किंवा उपरोक्त तत्त्वे प्रत्यक्षात उतरत नाहीत असे आपल्याला वाटत असल्यास, आम्ही आपल्या तक्रारी नोंदविण्यासाठी हॉटलाईनवर संपर्क साधण्यासाठी आपल्याला प्रोत्साहित करतो. आपल्याला आपले नाव सांगण्याची गरज नाही, परंतु जर आपण सांगितलेच तर, ते अत्यंत गुप्त राखले जाईल. हॉटलाईनचे अन्वेषक आपल्याला प्रतिसाद देतील.

हॉटलाइन सर्व समस्या किंवा तक्रारींचा तपास आणि निराकरण करण्यास बांधिल आहे आणि त्याची निष्पत्ती Magna च्या जागतिक मानव संसाधन विभागाला कळवणे आवश्यक आहे.

**हॉटलाईन क्रमांक: 0008004402485**

MAGNA

ECMMrIN201501